# ऋण निर्देश

हा शोधनिबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सादर करीत असताना मला अतिशय समाधान वाटत आहे. या शोधनिबंधासाठी डॉ.सौ. विभा शहा यांचे मार्गदर्शन मला लाभले. या लेखनाच्या निमित्ताने त्यांच्या प्रेमाचा, स्नेहाचा, जिव्हाळ्याचा जो लाभ मला झाला तो अवर्णनीय आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हा शोधनिबंध मी पूर्ण करु शकले.

या शोधनिबंधाच्या लेखनासाठी विषय निवडीपासून प्रा.गो.मा. पवार यांचे मार्गदर्शन मला लाभले. प्रा.ल.रा. नसिराबादकर, प्रा. प्रभाकर पाटील यांनीही या लेखनासाठी मला प्रोत्साहन दिले. या शोधप्रबंधाच्या निमित्ताने मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील प्राध्यापक वर्गाच्या जिव्हाळ्याचा व आपुलकीचा लाभ मला झाला. माझ्या सर्व गुरुवर्यांच्या ऋणात राहण्यातच मला अतिशय आनंद वाटतो.

कागल एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी मा.वाय्.डी. माने यांनी व सहकारी सदस्यांनी वेळोवेळी जी आपुलकी व प्रेरणा दिली त्यामुळेच हे लेखन शक्य झाले. तसेच या संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कागल येथील प्राचार्य, डॉ.जी.एल्. गबाले, सहकारी व कर्मचारी वर्ग यांनी सदैव मदतीचा हात पुढे केला, प्रोत्साहन व पाठिंबा दिला, त्यांचे सहकार्य अतुलनीय आहे.

या लेखनासाठी बॅ. बाळासाहेब खर्डेकर, ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील अधिकारी वर्ग व सेवकवर्ग यांनी बहुमोल सहकार्य केले. डी.आर. माने कॉलेज येथील ग्रंथपाल श्रीमती जक्लेकर व सेवकवर्ग यांनीही मला वेळोवेळी संदर्भग्रंथ उपलब्ध करुन दिले. या सर्वांची मी आभारी आहे.

या शोधनिबंधाची श्री. शहा यांनीही आपुलकीने चौकशी करुन प्रोत्साहन दिले त्यांचेही मी आभार मानते.

या शोधनिबंधाचे लेखन करताना माझे हितचिंतक, आप्तेष्ठ यांनीही मला सहकार्य केले, प्रोत्साहन दिले. त्यांच्यामुळेच हे काम मी पूर्ण करु शकले.

या शोधनिबंधासाठी निवडलेल्या ग्रंथांचा वाचकवर्ग मोठा आहे. काही वाचकांनी माझ्याशी अतिशय उत्साहाने चर्चा केली. आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यांच्या प्रतिक्रियातून या ग्रंथांच्या अभ्यासाबाबत नवी दिशा मला सापडली. या वाचकांचीही त्यामुळे मी ऋणी आहे.

या माझ्या अभ्यासाला माझे सासरे श्री. जंबूराव पत्रावळे व सासूबाई सौ. चंपावती पत्रावळे, माझे पती श्री. अजित पत्रावळे यांचे सहकार्य मिळाले नसते तर हे काम पूर्णच होऊ शकले नसते. त्याबद्दल मी त्या सर्वांची मन:पूर्वक ऋणी आहे. माझ्या अजिंक्यनेपण चांगला समंजसपणा दाखविला.

या शोधनिबंधाचे टंकलेखन श्री. खाडे यांनी वेळेवर पूर्ण करुन दिले. सन्मति मुद्रणालयाचे संचालक श्री. संगवे ए.व्ही. व मुद्रणविभागातील कर्मचारी वर्ग यांनी शोधनिबंधाची सुबक बांधणी करुन दिली या सर्वांची मी आभारी आहे.

– सौ. अनिता अजित पत्रावळे

.....